







# भारतीय भाषा आणि भाषिक कौशल्ये


- प्रा. डॉ. प्रदीप पाटील

सहा. प्राध्यापक, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

संपर्क - ९७६३२४३०१७

# ‘भारतीय भाषा दिन’ का साजरा होतो?

- तामिळ महाकवी सुब्रमण्यम भारती यांचा जयंती दिन म्हणून ११ डिसेंबरला भारतीय भाषा दिन साजरा केला जातो.
- सुब्रमण्यम भारती यांनी स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक म्हणून महत्त्वाचे कार्य केले आहे.
- आधुनिक तामिळ साहित्याचे उद्‍गाते म्हणून भारती यांना ओळखले जाते.
- स्वामी विवेकानंद यांचे त्यांनी शिष्यत्त्व पत्करले होते.
- भाषा-भाषांमध्ये भेदभाव न करता त्यांच्यामध्ये सामंजस्य राहावे, देशाच्या विकासात सर्वच भाषांची आवश्यकता आहे, असे त्यांनी प्रथम सांगितले.

# भारतीय भाषांचे सर्वेक्षण




- भारतात भाषा सर्वेक्षणाचे काम इंग्रजांच्या काळात १०० वर्षापूर्वी सर जॉर्ज ग्रियर्सन यांनी केले होते.
- २०२१ मध्ये प्रसिद्ध भाषातज्ज्ञ डॉ. गणेश देवी यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय भाषांचे सर्वेक्षण करण्यात आले.
- देशातील २००० भाषा तज्ज्ञांनी या कार्यात मदत केली.
- या सर्वेक्षणानुसार देशात ७५६ भाषा आहेत तर महाराष्ट्रात ६५ भाषा लिहिल्या व बोलल्या जातात.
- तर देशातील प्रमुख भारतीय भाषा (१८ भाषा) म्हणून मराठी, हिंदी, कन्नड, तामिळ, बंगाली, तेलगु, कोकणी, गुजराती, पंजाबी, आसामी, मल्याळम, काश्मिरी, मणिपुरी, उडिया, सिंधी, बोडो, डोंगरी, मैथिली या भाषांना ओळखले जाते.

# मराठी भाषेचे महत्त्व







- महाराष्ट्रात १३ कोटी लोकांची मातृभाषा मराठी आहे.
- जगात ७२ देशांमध्ये मराठी भाषिक आढळतात.
- जगात वीस हजार भाषा प्रचलित आहेत. सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत मराठी भाषेचा ९ वा क्रमांक आहे.
- देशात मराठी भाषेचा तिसरा क्रमांक लागतो.
- महाराष्ट्राबाहेर आंध्रप्रदेश, कर्नाटक, गोवा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि छत्तीसगड या सहा राज्यात मराठी शिकविली आणि बोलली जाते.

# मराठी भाषेतील साहित्यिक व साहित्य

- वारकरी साहित्य - संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, संत मेळा
- महानुभावीय साहित्य - साती ग्रंथ
- पंडिती साहित्य - वामन पंडित, श्रीधर, रघुनाथ पंडित आदि
- शाहिरी साहित्य - अनंत फंदी, राम जोशी, प्रभाकर, होनाजी बाळा आदि
- बखर साहित्य - महिकावतीचीबखर, सभासदांची बखर, पानिपतची बखर
- आधुनिक साहित्य - कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, ललित निबंध

# हिंदी भाषेचे महत्त्व







- १४ सप्टेंबर, १९४९ रोजी हिंदी भाषेला राजभाषा म्हणून घोषित करण्यात आले.
- १९१७ सालीच महात्मा गांधी यांनी हिंदी भाषेला राजभाषेचा मान मिळावा, म्हणून प्रयत्न केले होते.
- १५० देशांमध्ये हिंदी भाषिक लोक आढळतात.
- ४० देशातील ३०० पेक्षा जास्त विद्यापीठातून हिंदी भाषा शिकली व शिकवली जाते.
- जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत हिंदी भाषेचा ३ रा क्रमांक आहे.
- भारतात ४१ % लोकांची मातृभाषा हिंदी आहे.

# हिंदी भाषेतील साहित्यिक व साहित्य

- अंशुल मिश्रा - वक्त वक्त कि बात
- कवी अज्ञेय - भग्नदूत, महावृक्ष के नीचे
- उदयप्रकाश - तिरीछ, पिली छतरीवाली लडकी, मोहनदास
- तुलसीदास (संतकवी) - रामचरितमानस
- मैत्रेयी पुष्पा - ललमनिया
- प्रदीप सौरभ - मुन्नी मोबाईल
- प्रेमचंद्र - सेवासदन, कर्मभूमी, गोदान
- कबीर - दोहे
- पंकज मित्र - वशिन्दा : तिसरी दुनिया

# इंग्रजी भाषेचे महत्त्व







- आजच्या काळात इंग्रजीला ज्ञानभाषा म्हणून ओळखले जाते.
- जगातील ४५ देशांमध्ये इंग्रजी ही राजभाषा म्हणून प्रचलित आहे.
- जगातील एक तृतीयांश लोकांची ती व्यवहारभाषा आहे.
- जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत इंग्रजी भाषेचा पहिला क्रमांक आहे.
- जगात ७० कोटी लोकांची मातृभाषा इंग्रजी आहे.
- रवींद्रनाथ टागोर यांचा 'गीतांजली' हा कवितासंग्रह बंगालीतून इंग्रजीत गेल्यानंतरच त्यांना साहित्यातील सर्वोच्च पुरस्कार नोबेल पारितोषिक मिळाले.

# इंग्रजी भाषेतील साहित्यिक व साहित्य

## पाश्चात्य परंपरा

- कॅडमन - इंग्रजीचा आद्यकवी
- जेफ्री चोसर
- टा◌ॅ म्स एलियट
- शेक्सपिअर
- जोन मिल्टन
- जोन लिली
- फिलीप सिडनी
- डॉ. जोन्सन

## भारतीय परंपरा

- आर. के. नारायणन – मालगुडी डेज
- मुल्क राज आनंद – अनटचेबल
- खुशवंत सिंग – ट्रेन टू पाकिस्तान
- सलमान रश्दी – मिडनाईट चिल्ड्रेन
- अरुंधती रॉय – आझादी
- अरविंद अडिगा – द व्हाईट टायगर
- विक्रम सेठ
- झम्पा लाहिरी, अमिताव घोष
- चेतन भगत, अनिता नायर

# कन्नड भाषेचे महत्त्व







- सात हजार वर्षांची दीर्घ परंपरा कन्नड भाषेला आहे.
- जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत कन्नड भाषा ४० व्या क्रमांकावर आहे.
- देशाचा विचार करता सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत कन्नड भाषा ८ व्या क्रमांकावर आहे.
- ३.५ कोटी लोकांची कन्नड मातृभाषा आहे.
- कन्नड भाषेच्या प्रमुख ३२ बोली आहेत.
- कन्नड भाषेतील लेखकांना ८ ज्ञानपीठ तर ६३ साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले आहेत.
- गेल्या १५० वर्षात ३,५०,००० ग्रंथांची निर्मिती कन्नड भाषेत झाली आहे.

# कन्नड भाषेतील साहित्यिक व साहित्य

- कविराजमार्ग हा कन्नडमधील आद्यग्रंथ
- आदिपंप हा कन्नडमधील आद्यकवी
- कवी बसवेश्वर - भावगीते
- अक्कमहादेवी - वचने
- कुमार व्यास - कन्नड कवी शिरोमणी
- कुमार वाल्मिकी
- शिवराम कारंत - अशी धरतीची माया, डोंगराएवढा
- एस. एल. भैरप्पा - वंशवृक्ष
- गिरीश कर्नाड - तुघलक, हयवदन, नागमंडल
- चंद्रशेखर कंबार - नाटककार, कवी

# बंगाली भाषेचे महत्त्व







- जगात ३१ कोटी लोकांची मातृभाषा म्हणून बंगालीला ओळखले जाते.
- भारताबरोबरच पाकिस्तान, अमेरिका, नेपाळ, मलेशिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया यांसारख्या ४३ देशांमध्ये बंगाली भाषिक लोक आढळतात.
- देशाचा विचार करता सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत बंगाली भाषा दुसऱ्या क्रमांकावर आहे.
- बंगाली भाषेतील लेखकांना ७ ज्ञानपीठ तर ६४ साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले आहेत.

# बंगाली भाषेतील साहित्यिक व साहित्य

- बंकिमचंद्र चटर्जी - वंदे मातरम, आनंदमठ, दुर्गेशनंदिनी
- रवींद्रनाथ टागोर - गीतांजली, जन, गण, मन
- शरच्चंद्र चटर्जी - देवदास, सव्यसाची, श्रीकांत, माधवी
- विभूतिभूषण बॅनर्जी - पथेर पांचाली
- अरविंद घोष - सावित्री
- आलोक सरकार - आमार कबिता
- सुनील गंगोपाध्याय -
- हुमान्यू कबीर -

# तेलगू भाषेचे महत्त्व




తెలుగు

- आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या राज्यांची राजभाषा म्हणून तेलगूला ओळखले जाते.
- शास्त्रीय भाषा म्हणून तेलगुला ओळखले जाते.
- ७.५ कोटी लोकांची तेलगू ही मातृभाषा आहे.
- जगाचा विचार करता सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत तेलगू भाषा पंधराव्या क्रमांकावर आहे.
- तर देशाचा विचार करता सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत तेलगू भाषा चौथ्या क्रमांकावर आहे.

# तमिळ भाषेचे महत्त्व







- भारतातील अभिजात भाषेचा पहिला मान तमिळ भाषेला दिला गेला.
- श्रीलंका आणि सिंगापूर या देशात तमिळ भाषेस अधिकृत भाषेचा दर्जा देण्यात आला आहे.
- ६.५ कोटी लोकांची तमिळ ही मातृभाषा आहे.
- देशाचा विचार करता सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या क्रमवारीत तमिळ भाषा पाचव्या क्रमांकावर आहे.
- तमिळ भाषेतील लेखकांना २ ज्ञानपीठ तर ५८ साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले आहेत.

# भाषिक कौशल्ये – १. श्रवण







- आजकाल ऐकणे फार कमी झाले आहे.
- मानवी मेंदूत साठवून ठेवण्याची अफाट क्षमता.
- जितका वेळ मिळेल, तितके ऐकले पाहिजे.
- **साधन** - व्याख्याने, आकाशवाणी, मोबाईल, यु ट्यूब, स्टोरी टेल app

# भाषिक कौशल्ये – २. भाषण







- आज संवादच हरवला आहे.
- चांगल्या भाषणासाठी भाषा समृद्ध हवी.
- उच्चार स्पष्ट, आवाजात कणखरपणा आणि आत्मविश्वास गरजेचा.
- उपाय - १. संस्कृत, प्राकृत ग्रंथांचे मोठ्याने वाचन
  २. आरशासमोर सराव

# भाषिक कौशल्ये – ३. लेखन







- शुद्ध भाषा लिहिता आली पाहिजे.
- एखाद्याचं व्यक्तिमत्त्व त्याच्या अक्षरावरून लक्षात येते.
- नीट लिहिता येत नाही, लाज वाटायला हवी.

# भाषिक कौशल्ये – ४. वाचन




- एखाद्या विषयावर पाच मिनिटे बोलायचे असेल तर त्यासाठी पाच तास वाचावे लागते.
- आपल्या घरामध्ये हजारो रुपयाच्या फ्रीज, टीव्ही, सोफा या वस्तू असतात, देवघर सुद्धा असतं, पण पुस्तकं असत नाहीत.
- आपण आपल्या आई-वडिलांना हे आणा, ते आणा म्हणतो, पण पुस्तक आणा असे म्हणत नाही.





पुस्तके वाचण्याचे फायदे
ज्ञानवृध्दी
खरा मित्र
बुद्धी विकास
माहितीचा साठा
स्मरणशक्ती
चालू घडामोडी
सकारात्मक विचार
मेंदू सक्षम बनतो
योग्य अयोग्य समज
सर्वांगीण विकास
शब्दकोश वाढतो
चांगले संस्कार
चांगले आकलन
मार्मिकता
भावनिक विकास
समजूतदारपणा
समयसूचकता
प्रस्फुर्त वाणी
आत्मविश्वास
हजरजबाबीपणा
सावधपणा
भाषाभ्यास
मेंदूला व्यायाम
सारासार विचार
एकाग्रता वाढते
संयम शिकतो
कल्पकता वाढते
विचारकौशल्य
व्यक्तिमत्व विकास
संवादकौशल्य
छंदाची जोपासना
वाक्चातुर्य वाढते
ताण तणाव कमी
वेळेचा सदुपयोग
एकलकोंडेपणा घालवतात
कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी

# भाषिक कौशल्ये आत्मसात केल्याचे फायदे

- ज्ञानवृद्धी
- सकारात्मकता वाढते
- योग्य-अयोग्याची समज येते
- शब्दकोश वाढतो
- ज्ञानसाठा वाढतो

- आत्मविश्वास वाढतो
- संवाद कौशल्याचा विकास
- हजरजबाबीपणा वाढतो
- वैचारिक दृष्टी तयार होते.
- सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास

# भाषेचे महत्त्व

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने,
शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू,
शब्दची अमुच्या जीवाचे जीवन
शब्दे वाटू धन जन लोका...

- संत तुकाराम


धन्यवाद